# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### वसंतराव नाईक महामंडळावरील संचालक पदाच्या नियुक्तीसंदर्भात

**(१) ३३२१ (२२-१२-२०१४). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या धोरणानुसार वसंतराव नाईक महामंडळ (विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळ) मर्यादित या ठिकाणी "व्यवस्थापकीय संचालक, पदासाठी समाजशास्त्र व समाजकार्य विभागाचा पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण करुन कमीत कमी १० वर्षाचा वर्ग-१ संवर्गातील अधिकारी पदाचा अनुभव आवश्यक असतांना ही सध्या कमी शैक्षणिक पात्रता असलेल्या अधिकाऱ्यांची (श्री.बनसोड) नियुक्ती शासनाने केल्याचे दिनांक ३० ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याच पध्दतीने सामान्य प्रशासन व वित्त विभागाची मान्यता नसतानादेखील एकूण ८ ते १० प्रादेशिक व्यवस्थापकाच्या पदांची नियुक्तीदेखील नियमबाहय केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय वा त्यात काय आढळून आले आहे,

(४) तदनुसार केलेल्या नियमबाहय नियुक्त्या रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच श्री.बनसोड व्यवस्थापकीय संचालक यांची झालेली नियुक्ती रद्द करुन त्याठिकाणी समाजाला न्याय देण्यासाठी आय.ए.एस दर्जाचा अधिकारी नियुक्त करण्याबाबत शासनाची कोणती भूमिका आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०२-२०१६) :**(१) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या संस्थापन समयलेख आणि संस्थापन नियमावलीमध्ये महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक पदाकरीता शैक्षणिक पात्रता विहित करण्यात आलेली नाही. श्री.रमेश बनसोड, यांचेकडे शासनाचे दि.०८.०७.२०१५ च्या आदेशानुसार व्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार एक वर्षापर्यंत सोपविण्यात आला आहे.

(२) व (३) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळात प्रादेशिक व्यवस्थापकांची ६ पदे आहेत. महामंडळातील जिल्हा व्यवस्थापकांची ज्येष्ठता विचारात घेऊन ते एकाच पदावर बारा वर्षे नियमित सेवा केल्यानंतर शासनाच्या आश्वासित प्रगती योजनेनुसार प्रादेशिक व्यवस्थापकांची वेतनश्रेणी घेत आहेत, म्हणून महामंडळाच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक मंडळाच्या ठरावानुसार जिल्हा व्यवस्थापकांची प्रादेशिक व्यवस्थापक या पदावर नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक पद हे भारतीय प्रशासन सेवेतील पदाशी समकक्ष नसल्यामुळे सदर पद भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांमधून भरण्याचा प्रस्ताव नाही. मात्र अन्य समकक्ष दर्जाच्या पात्र अधिकाऱ्यांमधून श्री.बनसोड यांची मुदत संपल्यानंतर व्यवस्थापकीय संचालकाचे पद भरण्यात येईल.

---

### आमगाव (जि.गोंदिया) येथील आदिवासी शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंदर्भात

**(२) ४१९८ (२२-१२-२०१४). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमगाव तालुक्यातील (जि.गोंदिया) आदिवासी आश्रम शाळेमध्ये फक्त आदिवासी मुलांनाच प्रवेश देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर मागासवर्गीयांचा समावेश करण्यात यावा अशी शासनाकडे मागणी सातत्याने होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनूसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

**श्री. विष्णु सवरा (२३-०२-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) अशी बाब आढळून आली नाही.

(३) आदिवासी विकास विभाग आश्रमशाळा संहिता नियम, ३.१ अन्वये प्रत्येक वर्गात प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची कमाल संख्या ५० असावी. त्यापैकी वसतीगृहातील राहणारे ४० आदिवासी विद्यार्थी व १० बहिस्थ विद्यार्थी (स्थानिक ५ आदिवासी विद्यार्थी कर्मचाऱ्यांची मुले याप्रमाणे) असतील. तथापि आदिवासी उपयोजना क्षेत्राचे बाहेर (ओटीएसपी क्षेत्रात) असलेल्या आश्रमशाळेत पुरेसे निवासी विद्यार्थी नसतील तर १० पर्यंत अतिरिक्त बहिस्थ अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या पूर्व परवानगीने प्रवेश देता येईल. (तथापि ६०% विद्यार्थी उपस्थिती आवश्यक राहील अशी तरतूद करण्यात आली आहे.) तसेच या बहिस्थ विद्यार्थ्यांना शिक्षणा व्यतिरिक्त इतर सवलती अनुज्ञेय राहणार नाही अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

---

**वर्ध्यासह राज्यभरात व्यवसाय शिक्षण देणाऱ्या संस्थांनी बनावट विद्यार्थी दाखवून केलेल्या गैरव्यवहाराच्या अहवालाबाबत**

**(३) ५९२५ (०८-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्ध्यासह राज्यभरात व्यवसाय शिक्षण देणाऱ्या संस्थांनी बनावट विद्यार्थी दाखवून बनावट टी.सी. वर प्रवेश देवून शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या विद्यार्थी शुल्क वाटपातील गैरव्यवहार प्रकरणांबाबत दिनांक ९ ऑगस्ट, २०१२ रोजी नेमलेल्या समितीच्या क्रॉस इन्स्पेक्शनचा अहवाल सादर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवाल शासनास कधी सादर करण्यात आला व सदर अहवालातील निष्कर्षाच्या आधारे शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-०२-२०१६) :**(१) व (२) वर्धा जिल्ह्यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती/शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती योजनेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी दि.०९.०८.२०१२ च्या शासन निर्णयान्वये आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने दि.१६.०७.२०१४ च्या पत्रान्वये अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवालातील निष्कर्षांच्या आधारे शिष्यवृत्ती वाटपातील अनियमिततेसंदर्भात सदर संस्थांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे, संस्थांकडून शासकीय रकमांची वसुली करण्याची कार्यवाही करणेबाबतचे निर्देश आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांना देण्यात आले आहेत. तसेच सदर संस्थांची मान्यता रद्द करणेसंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागास कळविण्यात आले आहे. तसेच, गैरव्यवहारास जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती प्रवर्गाच्या धर्तीवर इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता जिल्हा व तालुकास्तरावर स्वतंत्र वसतीगृहे निर्माण करण्याबाबत**

**(४) ५९७० (१०-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती प्रवर्गाच्या धर्तीवर इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता जिल्हा व तालुकास्तरावर स्वतंत्र वसतीगृहे निर्माण करण्याची लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-०२-२०१६) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरज (जि.कोल्हापूर) येथील सेतू कार्यालयात एजंट म्हणून काम करणा$या व्यक्तीने बनावट कागदपत्रे बनवून जात वैधता प्रमाणपत्र मिळवल्याबाबत**

**(५) ६४१८ (०८-०४-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरज (जि.कोल्हापूर) येथील सेतू कार्यालयात एजंट म्हणून काम करणा-या प्रशांत हारगेवर यांना बनावट कागदपत्रे बनवून जात वैधता प्रमाणपत्र मिळवल्याप्रकरणी माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवडयात अटक केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच बनावट कागदपत्राद्वारे जात वैधता प्रमाणपत्राचे वाटप होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना केली आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) या प्रकरणी पोलिसांनी एका व्यक्तीस अटक केली असून त्याच्यावर भा.द.वि.स.कलम ४२०, ४६८ व ४७० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कार्यवाही चालू आहे.
(४) शंकास्पद प्रकरणांमध्ये पोलीस दक्षता पथकाकडून चौकशी केली जाते. भ्रमणध्वनीवरुन एसएमएसव्दारे जातवैधता प्रमाणपत्र तयार असल्याचे संबंधित अर्जदारांना कळविण्यात येते. तसेच जातवैधता प्रमाणपत्राची यादी डॉ.बाबासाहेब आंबडेकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येते. अर्जदाराव्यतिरिक्त अथवा त्याच्या संमतीपत्राशिवाय अन्य कोणासही जातवैधताप्रमाणपत्रे वितरीत केली जात नाहीत.

---

**सहकारी तत्वावर उभारलेल्या उपसा जलसिंचन प्रकल्पाच्या सबलीकरणासाठी भागभांडवल/अनुदान मिळणेबाबत**

**(६) ८६४९ (२८-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहकारी तत्वावर उभारलेल्या उपसा जलसिंचन प्रकल्पाच्या सबलीकरणासाठी भागभांडवल/अनुदान मिळणेबाबत निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी (वरोरा) दि. १४/१२/२०१४ रोजीच्या सुमारास मा.सहकार मंत्री, यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार सविस्तर प्रस्ताव सादर करण्यासंदर्भात सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांना कळविण्यात आले, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सहकारी तत्वावर उभारलेल्या उपसा जलसिंचन प्रकल्पाला अनुदान मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०३-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) सुधाकर बळीराजा उपसा जलसिंचन सहकारी संस्था तुळाना र.नं. ६०१ या संस्थेने उपसा जलसिंचन प्रकल्पाच्या सबलीकरणासाठी शासनाकडून भागभांडवल/अनुदान मिळणेबाबत दि.१३.१२.२०१४ रोजी मा. सहकार मंत्री यांना सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. वरोरा यांनी दि. १९.६.२०१५ च्या पत्रानुसार सदर संस्थेला सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबतच्या सुचना दिलेल्या आहेत. परंतु सदर संस्थेकडून अद्यापही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे नागनूर (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील हिरण्यकेशी नदीच्या प्रवाहाने पाणंद रस्ता खचत असल्याने शेतक-यांच्या शेतीचे होत असलेले नुकसान**

**(७) ८७७८ (०४-०४-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नागनूर (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील हिरण्यकेशी नदीच्या प्रवाहाने पाणंद रस्ता खचत असल्याने शेतक-यांच्या शेतीचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद् नुसार शेतक-यांचे शेतीपिकांचे नुकसान होवू नये म्हणून संरक्षण भिंत बांधणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) प्रश्नाधीन रस्त्याच्या सा.क्र.१९/०० ते १९/१०० मधील रस्त्याचा भराव वाहून गेल्यामुळे संरक्षण भिंत बांधण्याकरिता रुपये ३३.०० लक्ष इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

प्रश्नाधीन काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

---

**मागाठाणे मतदार संघातील वेस्टर्न एक्सप्रेस हायवे या प्रोजेक्ट मध्ये स्पार्क आयडी नं.२००, २०१, २०३ चे रोड बाईडींग मध्ये अडथळा आणणारे स्ट्रक्चर ताबडतोब तोडून सलग रोड जोडणी करण्याबाबत**

**(८) ११६७४ (०४-०४-२०१५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मागाठाणे मतदार संघातील वेस्टर्न एक्सप्रेस हायवे या प्रोजेक्ट मध्ये स्पार्क आयडी नं.२००, २०१, २०३ चे रोड बाईडींग मध्ये अडथळा आणणारे स्ट्रक्चर ताबडतोब तोडून सलग रोड जोडणी करावी याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ नोव्हेंबर, २०१४ रोजी श्री.विश्राम पाटील, सामाजिक कक्ष प्रमुख, एमएमआरडीए बांद्रा यांना एक लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०१-२०१६) :**(१) हे खरे आहे.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) प्रश्नाधीन निवेदन कार्यकारी अभियंता, मार्ग विकास क्र. ४, अंधेरी (पश्चिम), मुंबई यांच्याकडे आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविले आहे.
(२) रस्ता रुंदीकरणामध्ये अडथळा आणणारे प्रश्नाधीन स्ट्रक्चर तोडण्यात आले असून, अपूर्ण सेवा रस्त्याच्या जोडणीचे काम प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्ह्यातील कर्ज प्रकरणे निकालात काढण्याबाबत**

**(९) ११७९६ (०९-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, मा.अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ व मा.वसंतराव नाईक विमुक्त व भटक्या जमाती विकास महामंडळ यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०१५ पर्यंत विविध कर्ज प्रकरणे दाखल करण्यात आलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी आजतागायत काही प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत काय,

(३) अद्याप उक्त प्रकरणे निकाली काढण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०२-२०१६) :**(१) होय.

(२) होय. सदर महामंडळांकडे प्राप्त प्रकरणांपैकी निकाली काढलेल्या प्रकरणांचा तपशिल खालीलप्रमाणे आहेः-

| महामंडळाचे नांव | प्राप्त प्रकरणे | निकाली |
|---|---|---|
| साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ | ३१०० | १३४३ |
| महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ | ४१२ | १४४ |
| वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ | ५६ | १९ |
| मा.अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ | १५ | १२ |

(३) निकाली न काढलेल्या प्रकरणांची कारणे खालीलप्रमाणे आहेतः-

i) महामंडळास शासनाकडून व एनएसएफडीसी कडून मिळणा-या निधीच्या प्रमाणात उपलब्ध कर्ज प्रस्ताव निकाली काढण्यात येतात. प्रलंबित राहिलेल्या प्रस्तावांवर पुढील निधी प्राप्त होईल त्याप्रमाणे कार्यवाही केली जाते.

ii) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या कर्ज योजनांकरिता शासन आदेश दि. २ डिसेंबर, २०१४ अन्वये कर्ज मंजूरी व कर्ज वितरणास स्थगिती देण्यात आली होती. सदर स्थगिती एन.एस.एफ.डी.सी. कर्ज योजना या बाबीसाठी निकषांचे उल्लंघन होणार नाही या अटीच्या अधिन राहून शिथिल करण्यात आली आहे.

iii) मा.अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ यांचेकडील प्रलंबित ३ प्रकरणांपैकी २ प्रकरणे त्रुटींची पुर्तता न केल्यामुळे तसेच, एका प्रकरणामध्ये बँकेचे मंजूरी पत्र जिल्हा कार्यालयाकडून अपलोड होणे बाकी असल्यामुळे सदर महामंडळाकडील ३ प्रकरणे प्रलंबित आहेत.

---

**ग्राम अदासी (ता.जि.गोंदिया) येथील नाथजोगी समाजाचे**
**लोक दयनीय स्थितीत राहत असल्याबाबत**

**(१०) १५७७६ (०९-०४-२०१५). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्राम अदासी (ता.जि.गोंदिया) येथे अनेक दशकापासून नाथजोगी समाजाचे लोक दयनीय स्थितीत वास्तव्यास आहेत व भटकंती करून उपजीविका करतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यांचे जीवनमान उंचावणे व त्यांना स्थिरता मिळावी यासाठी शासनाने त्यांना भूखंड आणि घरे बांधून देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (११-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) या विभागाच्या दि.२७/११/२०११ च्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील कुटुंबाचे राहणीमान उंचावणे, त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढून त्यांना स्थिरता प्राप्त व्हावी यासाठी ग्रामीण भागातील विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील घटकांसाठी राज्यात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबविण्यात येत आहे. या योजनेखाली विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील कुटुंबांना प्रत्येक पाच गुंठे जमिन उपलब्ध करुन देऊन त्यावर त्यांना २६९ चौ.फु. ची घरे बांधून देण्यात येतात व उर्वरित जागेवर लाभार्थी कुटुंबांना विविध शासकीय योजनांद्वारे स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्याची योजना सन २०१२-१३ पासून लागू करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयात महाराष्ट्र सावकारी (नियमन, सुधारणा) अधिनियम २०१४ ची अंमलबजावणी करुन जिल्हयातील वैध सावकारांची (अधिकृत परवानाधारक) यादी घोषीत करण्याच्या मागणीबाबत**

**(११) १६९६१ (१९-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयात महाराष्ट्र सावकारी (नियमन, सुधारणा) अधिनियम २०१४ ची अंमलबाजावणी करुन जिल्हयातील वैध सावकारांची (अधिकृत परवानाधारक) यादी घोषीत करण्याच्या मागणीसाठी माहे मे, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी धरणे आंदोलन करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या धरणे आंदोलना दरम्यान दिलेल्या निवेदनामध्ये महाराष्ट्र सावकारी नियम व सुधारणा २०१४ नुसार कर्जावर आकारावयाचे प्रतिवर्ष व्याजदर निश्चत करण्यात आलेले आहेत त्याप्रमाणे शेतकरी व इतर व्यक्तीने कर्ज पुरवठा करण्यात यावा तसेच जिल्हयातील वैध अथवा परवानाधारक सावकारांची यादी घोषीत करुन सावकारांनी दिलेल्या कर्जाचा तपशिल व रक्कम संबंधित शेतक-यांना त्वरीत माहिती देण्यात यावी, अवैध सावकारी करुन शासनाचा करोडो रुपयांचा महसूल व कर बुडवून शेतक-यांच्या शेतजमिनी हडप करणा-या सावकारांची अवैध मालमत्ता तसेच जमीन आर्थिक व्यवहार व संपत्तीची सीआयडी चौकशी करण्यात यावी

व अशा अनेक मागण्या मांडण्यात आल्या असून या प्रकरणी शासनाने त्वरीत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०३-२०१६) :**(१) नाही.

नांदेड जिल्ह्यातील वैध सावकारांची (अधिकृत परवाना) यादी घोषित करणेबाबत श्री.शिवाजीराव बोकरे यांचे निवेदन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांना जिल्हाधिकारी, नांदेड यांचेकडून प्राप्त झाले. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांनी जिल्ह्यातील वैध सावकाराची यादी श्री. बोकरे यांना दि.२०/५/२०१५ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर-औरंगाबाद या एक्सप्रेस हायवेवरील वाशिम जिल्ह्यातील मालेगांव ते डोणगांव हा रस्ता वाहतुकीसाठी खराब झाल्याबाबत

**(१२) १७२६० (३१-०७-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-औरंगाबाद या एक्सप्रेस हायवेवरील पथकर बंद झाल्यापासून संबंधित विभागाकडून हा रस्ता दुर्लक्षित झाल्यामुळे या हायवेवर वाशिम जिल्ह्यातील मालेगांव ते डोणगांव या भागात पावसाळ्यापासून मोठमोठे खड्डे पडून रस्ता वाहतुकीसाठी खराब झाल्यामुळे या रस्त्यावर दुचाकी, चारचाकी, भारवाहक वाहनांचे सरासरी एक दिवस आड अपघात घडून त्यात अनेकांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या एक्सप्रेस हायवे दुरुस्तीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी तसेच अनेकांनी निवेदन देवून व रास्तारोको करून दुरूस्ती संदर्भात मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) :**(१) व (२) हे अंशतः खरे आहे.

(३) रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम प्रगतीत असुन रस्ता वाहतूकीस सुस्थितीस ठेवण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शेतकऱ्यांना सावकारी कर्जातून मुक्ती देण्यासाठी शासनाने कर्जमाफीची घोषणा केल्याबाबत

**(१३) १७३१५ (१९-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना सावकारी कर्जातून मुक्ती देण्यासाठी शासनाने कर्जमाफीची घोषणा केली आहे त्यामुळे विदर्भ व मराठवाड्यातील शेतक-यांचे १७१ कोटीचे कर्ज माफ होणार आहे त्याबाबतचे आदेशही देण्यात आले असून याप्रकियेकरीता सावकारांना केवळ तीन दिवसाचा अवधी देण्यात आला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून गेल्या वर्षभरात एकही प्रकरण निकाली काढले गेले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शेतक-यांना जिल्हा उपनिबंधक कार्यालयावर मोर्चा काढून दाद मागावी लागली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिरंगाई करणाऱ्या दोषी अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच सदर प्रकरण निकाली काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०३-२०१६) :**(१) नाही.

(२) अकोला जिल्ह्यात माहे डिसेंबर, २०१५ अखरे ७ कर्जदारांचे रु.१.३५ लाख रक्कमांचे कर्ज माफ करण्यात आले असून सदर रक्कम संबंधित सावकारास अदा करण्यात आली आहे व कर्जदारास कर्जमुक्ती प्रमाणपत्रे देण्यात आलेली आहेत.

(३) नाही.

(४) व (५) आणि (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील इगतपुरीसह राज्यात पाच क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्याबाबत

**(१४) १८२६१ (०६-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील इगतपुरीसह राज्यात पाच क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्यास माहे ऑगस्ट, २००९ मध्ये आदिवासी विकास विभागाने मंजुरी देवूनही माहे मे, २०१५ पर्यंत सदर प्रबोधिनीचे काम सुरु झालेले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जमातींच्या मुलांना क्रीडा विषयक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी उक्त क्रीडा प्रबोधिनी तातडीने स्थापन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-०३-२०१६)** :(१) हे खरे आहे.
(२) सदर क्रीडा प्रबोधिनी तात्पुरत्या स्वरुपात क्रीडा विभागाच्या नाशिक येथील क्रीडा संकुलात सुरु करण्यात आलेली आहे.

सदर क्रीडा प्रबोधिनीत शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच एकलव्य शाळांमधील Sports Specific Test मध्ये पात्र ठरलेल्या ८३ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. सदर विद्यार्थ्यांना तज्ञ क्रीडा प्रशिक्षकांमार्फत दररोज धावणे, खो-खो, कबड्डी, गोळाफेक, थाळीफेक इत्यादी खेळांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील धामणंद जाधववाडी ते धामणंद गुडयाचा आड व कावळे ते कासई रस्ताचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१५) १८३८६ (१७-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील धामणंद जाधववाडी ते धामणंद गुडयाचा आड या १,३०० मीटर रस्त्याचे तसेच याच तालुक्यातील कावळे ते कासई या १ किलोमीटर रस्ता डांबरीकरण या दोन्ही कामांचे आदेश सुमारे एक वर्षापूर्वी ठेकेदाराला देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दोन्ही कामांचा ठेकेदार एकच असून त्याने धामणंद जाधववाडी ते धामणंद गुडयाचा आड या रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत ठेवले असून कावळे ते कासई रस्त्याचे काम आजतगायत सुरु केलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काम न करणारा ठेकेदार आणि संबंधित अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०१-२०१६)** :(१) होय
(२) सदर दोन्ही कामांचा ठेकेदार एकच आहे. ही बाब खरी आहे.

धामणंद जाधववाडी ते धामणंद गुडयाचा आड या रस्त्याचे काम बीबीएमचे काम पूर्ण असून उर्वरित काम प्रगतीत आहे.

कावळे कसाई रस्ता या रस्त्याचे काम प्रगतीत आहे.
(३) ठेकेदारास काम पूर्ण करणेबाबत वारंवार नोटीस देण्यात आलेल्या आहेत. तथापि अपूऱ्या

निधीमुळे ठेकेदाराचे देयक देणे शक्य न झाल्याने दंडात्मक कार्यवाही करण्यात आली नाही.
(४) सदर कामास वेळेत पुरेसा निधी उपलब्ध झाला नसल्यामुळे विलंब झाला आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.

---

**मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील (ता.खेड,जि.रत्नागिरी) येथील भोस्ते घाटाला पर्यायी रस्ता उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१६) १८३८७ (०४-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्याच्या हद्दीत येणाऱ्या भोस्ते घाटात सातत्याने छोट-मोठे अपघात होतात आणि पावसाळ्यात सतत कोसळणाऱ्या दरडींमुळे महामार्गावरील वाहतूक ठप्प होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घाटाला पर्यायी असलेला भोस्ते-निळीक-कोंडीवलीमार्गे शिव खुर्द हा रस्ता व्हावा, याकरिता संबंधितांकडे अनेक वर्षापासून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास सदर पर्यायी रस्ता होणेसाठी शासनाने निधीच्या तरतुदीसाठी कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०३-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे. रस्त्यावर दरडी कोसळल्यानंतर त्या तातडीने हटवून रस्ता वाहतुकीस पुन्हा खुला करण्यात येतो.
(२), (३), (४) प्रश्नांकीत वेरळ भोस्ते कोंडीवली शिव बोरज हा नवीन रस्ता करावयाचा नसून सदर रस्ता अस्तित्वात असून इतर जिल्हा मार्ग क्र. ३३ असा आहे. सदर रस्त्याची एकुण लांबी १५.०० कि.मी. असून संपुर्ण पृष्ठभाग डांबरी आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत विविध मागण्या प्राप्त झालेल्या आहेत. सदर रस्त्याचे सन २०१३-१४ मध्ये ठोक निधी अंतर्गत ३.०० कि.मी. व पुरहानी दुरस्ती गट-ड अंतर्गत ०.५०० कि.मी. असा एकुण ३.५०० कि.मी. लांबीचे डांबरी नुतनीकरणाचे काम पुर्ण करण्यात आले आहे. सन २०१५-१६ मध्ये रस्ते, पुल देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम गट-ब अंतर्गत १.०० कि.मी. चे डांबरी नुतनीकरण करण्याचे काम जिल्हा परिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे. रस्ते लांबीच्या प्रमाणात विभागास उपलब्ध होणारा निधी अत्यंत अल्प आहे. या उलट शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या मागण्या जास्त आहेत. जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून उर्वरित रस्त्याचे काम टप्प्याटप्प्याने करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे, असे ग्राम विकास व जलसंधारण विभागाने कळविले आहे.

---

**नागपूर-औरंगाबाद राज्य महामार्गावर खड्डे पडल्याने अपघातांच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत**

**(१७) १९७८६ (०७-०८-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-औरंगाबाद राज्य महामार्गावर मोठमोठे खड्डे पडल्याने दिवसेंदिवस अपघातांचे प्रमाण वाढले असून अनेक निष्पाप लोकांचे प्राण जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गाच्या दुरुस्तीबाबत शासनाने निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या महामार्गाची दुरुस्ती काम केव्हापर्यंत करण्यात येणार आहे तसेच यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) सदर रस्त्यावर पडलेले खड्डे भरण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिला आहे.

(३) सदर रस्त्यावर पडलेले खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत करण्यात आला आहे. सदर रस्त्याचे मजबुतीकरणाचे काम निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रोहा (जि.रायगड) येथील कुंडलीका नदीवरील पालदाड पुलावरील बांधकाम अतिशय दयनीय अवस्थेत असल्याबाबत**

**(१८) २०१४२ (१३-०८-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा (जि.रायगड) तालुक्यातील कुंडलिका नदी पलिकडील १६ गावांसाठी सन २००० मध्ये वा त्यासुमारास पालदाड या ठिकाणी सुमारे सव्वा कोटी रुपये खर्च करुन जून्या पूलानजिक नविन पुलाचे बांधकाम करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलाची अतिशय दयनीय अवस्था होवून पुलाचे संरक्षक कठडे नेस्तनाबूत झाले असून लोखंडी पाईप भंगार चोरट्यांनी चोरल्याचे निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुलावरुन रहदारी करताना धोका निर्माण झाल्यामुळे सदर पुलाची तातडीने दुरुस्ती करण्यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :**(१) प्रश्नांकित पूलाचे बांधकाम २००१ साली सार्वजनिक बांधकाम विभागाने केले आहे.

(२) व (३) सदर पुलाचे बांधकाम सुस्थितीत असून वाहतूकीस योग्य आहे. पंरतू पुलाचे लोखंडी

रेलींग व कठड्याचे नुकसान झालेले आहे. या कामाकरीता निधीची मागणी जिल्हा नियोजन अधिकारी यांच्याकडे दिनांक ८.७.२०१५ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदेने केली आहे.

---

**नेवासा येथील तहसिल कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(१९) २०८१२ (१०-०८-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) येथील तहसिल कार्यालयाच्या नवीन इमारतीचे काम गेल्या ५ वर्षापासून निधीअभावी बंद असल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसिल कार्यालयांचे बंद असलेले काम त्वरित सुरुकरण्यासाठी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०३-२०१६) :**(१) व (२) प्रश्नाधीन इमारतीचे काम निधी अभावी बंद असल्याचे निदर्शनास आले हे खरे नाही.

(३) प्रश्नाधीन इमारतीचे काम प्रगतीपथावर असून कामावर आतापर्यंत रु. १४१.७८ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे.

सदर काम निधीच्या उपलब्धेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**गाळण बु. (ता.पाचोरा, जि.जळगांव) या गावाकडे जाणाऱ्या पूलावरील रस्त्यांची गेल्या सहा वर्षापासून अत्यंत दुरवस्था झाली असल्याबाबत**

**(२०) २४३८९ (१७-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गाळण बु. (ता.पाचोरा, जि.जळगांव) या गावाकडे जाणाऱ्या पूलावरील रस्त्यांची गेल्या सहा वर्षापासून अत्यंत दुरवस्था झाली असून पूलदेखील अस्तित्वात राहिलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे गावातील लहान मुले, अपंग व वृध्दांना खड्डयातून वाट काढावी लागत असल्याने अनेक छोटे-मोठे अपघात होतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) रा.मा.१७ वरील गाळण गावाजवळील रस्ता सुस्थितीत व वाहतुकीयोग्य असल्याने रस्त्याची दुरुस्ती करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्ह्यातील ४५० सहकारी संस्था अवसायानात निघाल्याबाबत**

**(२१) २५३५२ (१९-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्ह्यातील ४५० सहकारी संस्था अवसायानात निघाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थांची मालमत्ता लिलाव प्रक्रिया शासनाने सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्था पुनर्जिवीत करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०३-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. बुलढाणा जिल्ह्यात एकूण ७३७ सहकारी संस्था अवसायनात घेण्यात आल्या आहेत.
(२) ज्या संस्थेकडे मालमत्ता आहे व संस्थेकडे इतरांचे देणी बाकी आहेत अशी देणी भागविणे व संस्थेची नोंदणी रद्द करणे आवश्यक असल्याने, संस्थांची मालमत्ता विक्री करण्याच्या अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही सुरु आहे.
(३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १९ नुसार अवसायनातील संस्थांचे पुनर्जीवन करण्याची तरतूद आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाड तालुक्यातील (जि.रायगड) बिरवाडी ढालकाठी-खरवली पुल धोकादायक झाल्याबाबत**

**(२२) २६५१४ (०७-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड तालुक्यातील (जि.रायगड) बिरवाडी ढालकाठी-खरवली पुल धोकादायक स्थितीमध्ये असून ऐन पावसाळ्यात संपर्क तुटण्याची भीती निर्माण झाल्याचे नुकतेच माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलावरुन पुणे, महाड बससेवा तसेच रामदास स्वामीचे दासबोधाचे ठिकाण असलेले शिवथरघळ, पिंपळवाडी वरंध या ठिकाणी जाणा-या वाहतुकीकरिता हा पुल महत्त्वाचा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाकरिता चार वर्षापूर्वीच अडीच कोटी रुपये एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे परंतु सदरचा पुल उभारण्याकरिता वाढीव निधीची आवश्यकता असल्याने पुलाचे प्रस्तावित काम रखडलेले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तसेच तद्नुसार पुलाच्या दुरुस्तीकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०३-२०१६) :**(१) नाही.

अस्तित्वातील पुल वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.

(२) व (३) होय.

(४), (५) व (६) सदर पुल वाहतुकीस अपुरा पडत असल्याने या ठिकाणी नविन पुल बांधण्याच्या कामास रु.५६८.२३ लक्ष होत असल्याने या कामास सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

या कामास सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेऊन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

## राज्यातील रस्त्यांची दुरावस्था दूर करण्यासाठी निधी मंजुरीबाबत

**(२३) २८४३१ (२३-१२-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रस्ते दुरुस्तीसाठी सन २०१५ - १६ च्या अर्थसंकल्पात ५०० कोटींचीच तरतूद असल्यामुळे तसेच राज्य शासनाने ५६ टोल नाके बंद केल्यामुळे राज्यातील रस्त्यांची खड्यांमुळे चाळण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील रस्त्यांची दुरावस्था दूर करण्यासाठी निधी मंजुरीसाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०३-२०१६) :**(१) व (२) सन २०१५-१६ मध्ये रस्ते परिरक्षण व दुरुस्तीसाठी रु.१६८२ कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आले आहे. तसेच दि.१/०६/२०१५ पासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडील खाजगीकरणांतर्गत सुरु असलेल्या रस्त्यांवरील ४४ व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडील १२ अशी एकुण ५६ पथकर स्थानके बंद करण्यात आलेली आहेत. ऑक्टोबर, २०१५ अखेर राज्य मार्गावरील ९०% खड्डे व प्रमुख जिल्हा मार्गावरील ७१% खड्डे भरण्यात आले आहे. सद्यस्थितीत राज्यातील राज्य मार्ग/ प्रमुख राज्य मार्ग / प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांच्या परिरक्षण व दुरुस्तीसाठी

आतापर्यत रु. १६०३ कोटी इतका निधी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**धामनंद- गुडयाचाआड (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील रस्त्याचे काम अपूर्ण असलेबाबत**

**(२४) २८४५९ (२३-१२-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील धामनंद गुडयाचाआड (ता.खेड) या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाचे आदेश ठेकेदारास देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामाचे आदेश मिळून तीन वर्ष होत आली तरी हे काम पूर्णत्वास गेलेले नाही आणि त्यामुळे सदर रस्ता वाहतुकीच्यादृष्टीने अतिशय अडचणीचा बनला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, काम पूर्ण न होण्यास जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे तसेच रस्त्याचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०३-२०१६) :**(१) होय, ठेकेदारास कार्यारंभ आदेश दि. १३/०५/२०१४ रोजी दिलेले आहेत.
(२) कामाचा आदेश देऊन १ वर्ष ९ महिने झालेले आहेत. बीबीएम पर्यत काम पुर्ण झालेले असून कारपेट व सिलकोट चे काम प्रगतीत आहे. सदर रस्त्यावरुन वाहतुक सुरळीत चालु आहे
(३) व (४) सदरहु काम अपुऱ्या निधीमुळे प्रलंबित राहीले असून मार्च, २०१६ अखेर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**मु.पो.आडे उटंबर (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील खाडीच्या तोंडावर बंधारा बांधण्याबाबत**

**(२५) २९५७६ (२२-१२-२०१५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासन निर्णय क्र.एमआयएस ०१२/प्र.क्र.६४ बंदरे-२, दि.२१/०५/२०१५ नुसार सागरी धुप प्रतिबंधक बांधकामे (२७११ ०९३१) ही राज्यस्तरीय योजना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रशासकिय नियंत्रणाखाली आणण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मु.पो.आडे उटंबर, ता.दापोली, जि.रत्नागिरी येथील खाडीच्या तोंडावर बंधारा बांधून मिळावा व त्यासाठी ५० लक्ष रूपयांच्या निधीची तरतूद करण्यात यावी असे मा.महसूल तथा मत्स्यव्यवसाय मंत्री यांचे पत्र क्र. ई १००२८९१, दि. ०९/०४/२०१५ नुसार महाराष्ट्र मेरिटाम बोर्ड मुंबईचे अधिक्षक अभियंता यांनी दिनांक २० जुलै, २०१५ रोजी किनारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रशासकीय इमारत, बांद्रा (पूर्व) मुंबई यांना पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बंधाऱ्याबाबतच्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे वा या बंधाऱ्याच्या कामाच्या पूर्ततेसाठी किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) नाही. सदर पत्र प्रादेशिक बंदर अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, रत्नागिरी यांनी पत्तन अभियंता, पत्तन विभाग, रत्नागिरी यांना दिनांक २७/१०/२०१५ रोजी परस्पर पाठविले आहे.
(३) सागरी धूपप्रतिबंधक बंधारे बांधणे ही योजना दि.२१/०५/२०१५ च्या शासन निर्णयानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आली आहे. या अनुषंगाने सदर योजनेकरीता लेखाशिर्ष निर्माण करण्याचे काम शासनस्तरावर प्रगतीपथावर आहे. लेखाशिर्ष निर्माण झाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार सदरील काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**ठाणे जिल्हयातील मुंब्रा बायपास रस्त्यावर होणाऱ्या अपघातास**
**प्रतिबंध करण्यासाठी संरक्षण भिंत बांधण्याबाबत**

**(२६) २९८२५ (२२-१२-२०१५). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील मुंब्रा बायपास रस्त्यावर होणा-या अपघातास प्रतिबंध करण्यासाठी संरक्षण भिंत बांधण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) तसेच सदर काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०३-२०१६) :**(१) मुंब्रा बायपास रस्त्यावर कि.मी. ३३/८०० ते १३८/२०० या लांबीत संरक्षक भिंत, गॅबीयन वॉल व रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे कामास सन २०१५-१६ च्या मार्च २०१५ च्या अर्थसंकल्पात मंजूरी प्राप्त झाली आहे.
(२) सदर कामास तांत्रिक मंजूरी प्राप्त झाली असून काम निविदास्तरावर आहे.
(३) सदर कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण करुन निधीच्या उपलब्धतेनुसार संरक्षक भिंतीचे व गॅबीयन वॉलचे काम लवकरावत लवकर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील १३ जिल्ह्यात आदिवासी बहुल क्षेत्रातील सर्व समाजाच्या गरोदर व स्तनदा मातांना कुपोषणाच्या विळख्यातून सोडविण्यासाठी दुपारचा मोफत सकस आहार देण्याबाबत**

**(२७) ३०१०५ (१२-०१-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १३ जिल्ह्यात आदिवासी बहुल क्षेत्रातील सर्व समाजाच्या गरोदर व स्तनदा मातांना कुपोषणाच्या विळख्यातून सोडविण्यासाठी दुपारचा मोफत सकस आहार देण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी वर्षाला किती खर्च अपेक्षित आहे,

(३) असल्यास, ही योजना केव्हापासून राबविण्यात येणार आहे,

(४) असल्यास, या योजनेचा लाभ माहे नोव्हेंबर, २०१५ अखेर किती आदिवासी मातांना झाला आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०९-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.

आदिवासी विकास विभागाच्या दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु करण्यात आली असून सदर योजना १६ जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत गावातील अंगणवाडी मार्फत राबविण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत गरोदर स्त्रियांना शेवटच्या तिमाहीत व स्तनदा मातांना बाळंतपणानंतर पहिल्या तिमाहीत याप्रमाणे सहा महिन्याच्या कालावधीकरिता एक वेळचा चौरस आहार देण्यात येणार आहे.

(२) या योजनेकरिता एका वर्षासाठी सुमारे रु. ४५.०० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

(३) सदर योजना दिनांक १ डिसेंबर, २०१५ पासून राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगमनेर तालुक्यातील (जि.नाशिक) शासकीय विश्रामगृहाची दयनीय अवस्था झाल्याबाबत**

**(२८) ३०७२८ (२२-१२-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर तालुक्यातील (जि.नाशिक) पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील डोळासणे येथील ब्रिटीश कालीन शासकीय विश्रामगृहाची अतिशय दयनीय अवस्था झाली असून भिंतीना भेगाही पडलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पठार भागाचे मध्यवर्तीचे ठिकाण म्हणून पूर्वी ब्रिटीश अधिकाऱ्यांनी डोळासणे येथे उभारलेल्या शासकीय विश्रामगृहाची देखभाल व दुरूस्ती अभावी दयनीय अवस्था झाली

असून या विश्रामगृहात भटक्या कुत्र्यांचा सर्रासपणे वावर सुरू आहे, हेही खरे आहे काय,
(३) सदरहू विश्रामगृहाची विनाविलंब पुर्नबांधणी करून ते लवकरात लवकर कार्यान्वित व्हावे यासाठी त्या परिसरातील ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, संगमनेर, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, नाशिक जिल्हा आदिंकडे मागील ५ वर्षांपासून लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुणे-नाशिक महामार्गालगत असणाऱ्या ब्रिटीश कालीन डोळासणे येथील शासकीय विश्रामगृहाची विनाविलंब पुर्नबांधणी करून ते लवकरात लवकर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०३-२०१६) :**(१) व (२) होय.

सदर विश्रामगृह सन १८८६-८७ बांधण्यात आले आहे. विश्रामगृहाचे बांधकाम १३० वर्षे जुने असल्याने त्याची दयनीय अवस्था झाली आहे. परिणामी विश्रामगृहाचा वापर होत नाही.
(३) असे निवेदन प्राप्त झालेले नाही.
(४) व (५) उपलब्ध निधी व निकषांचे अधीन राहून कामास मान्यता देण्याचे नियोजित आहे.

---

## पुण्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाच्या इमारतीसाठी निधीची तरतूद केली नसल्याबाबत

**(२९) ३०८५१ (२२-१२-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यात शिक्षणासाठी येणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासाठी हडपसरमधील महंमदवाडी येथे तीन वर्षापूर्वी पाच गुंठे जागा राज्य शासनाने खरेदी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाने प्रत्यक्षात वसतिगृहाच्या इमारतीसाठी निधीची तरतूद केली नसल्याने अद्यापही इमारतीचे काम होवू शकले नाही, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, इमारतीसाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-०३-२०१६) :**(१), (२) व (३) विभागाच्या दि.२६.०८.२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, मांजरीफार्म (क्षमता १०००) जि. पुणे करिता मौजे हडपसर (महंमदवाडी) येथे ९३ आर जमीन खरेदी करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत वसतिगृह इमारतीच्या बांधकामाचे प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास प्राप्त झालेले अंदाजपत्रक रु.५.०० कोटी रकमेपेक्षा अधिक असल्याने मा.मुख्य सचिव यांच्या

अध्यक्षतेखालील सचिव स्तरीय समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. तथापि, वसतीगृह बांधकामाचे विभागाचे दायित्व अधिक असल्याने सचिव समितीने सदर प्रस्तावास मंजूरी दिली नाही.

या वसतीगृह इमारतीचे प्रशासकीय मान्यतेसाठी प्राप्त झालेले अंदाजपत्रक सन २०१२-१३ च्या दरसुचीवर आधारीत होते. दरम्यानच्या काळात बांधकामाच्या दरसूचीमध्ये सुधारणा झाल्याने सदर अंदाजपत्रक सन २०१४-१५ च्या दरसुचीप्रमाणे सुधारीत करुन मुख्य अभियंता यांच्या साक्षांकनासह शासनास सादर करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास यांना दि. १४.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

सुधारीत दरसुचीवर आधारीत अंदाजपत्रक शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यास प्रशासकीय मान्यता देण्याची तसेच प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर निधीची तरतूद करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई शहरात दि महाराष्ट्र स्टेट को.ऑप. मार्केटिंग फेडरेशनने मंजूर केलेली विक्री केंद्रे मालकी हक्काने देण्याबाबत**

**(३०) ३११७३ (२१-१२-२०१५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात सुशिक्षित बेकारांना उपजिविकेचा व्यवसाय उपलब्ध व्हावा व नागरिकांना स्वस्त जीवनावश्यक वस्तू व अन्नधान्य मिळावे यासाठी दि महाराष्ट्र स्टेट को.ऑप. मार्केटिंग फेडरेशनने मंजूर केलेली विक्री केंद्रे गेल्या २५ वर्षापासून म्हाडा व महानगरपालिका तसेच शासनाच्या जागेवर सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विक्री केंद्राला मार्केटिंग फेडरेशनमार्फत कोणकोणत्या वस्तू उपलब्ध करुन दिल्या जातात व त्यांना कोणत्या सोयी व सुविधा पुरविल्या जातात,

(३) असल्यास, सदर विक्री केंद्र चालकांनी स्वत:च्या मालकी हक्काने करण्यात यावीत अशी मागणी गत १५ वर्षापासून सातत्याने महाराष्ट्र स्टेट को.ऑप मार्केटिंग फेडरेशनकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विक्री केंद्रे चालकांना मालकी हक्काने देण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात आला आहे वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०२-२०१६) :**(१) होय.

(२) सुरुवातीच्या किरकोळ विक्री केंद्रांना अन्नधान्य, मसाले, दूध, तेल इ. वस्तू पणन महासंघाकडून पुरविल्या जात होत्या. सध्या कोणत्याही वस्तुचा पुरवठा केला जात नाही.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी येथील सार्वजनिक बांधकाम विभागात निधीचा अपहार केल्याबाबत**

**(३१) ३१३०४ (२२-१२-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील सार्वजनिक बांधकाम विभागात ३०५४ एस.आर.टू रोड या हेड अंतर्गत मिळालेला निधी प्रत्यक्ष काम न करता ५ कोटी रुपये निधीचा अपहार केल्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजी पत्र देऊन संबंधितावर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग औरंगाबाद यांनी याप्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याचे आदेश देऊन अद्यापही कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषी अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदारावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्नाधीन बाबीची अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांच्या स्तरावर चौकशीची कार्यवाही चालू आहे.

---

**देगूलर व बिलोली (जि.नांदेड) येथील तहसिल व उपजिल्हाधिकारी कार्यालय अंतर्गत असलेल्या शासकीय निवासस्थानाची अत्यंत दुरावस्था झाल्याबाबत**

**(३२) ३२२३१ (२२-१२-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगूलर व बिलोली (जि.नांदेड) येथील तहसिल व उपजिल्हाधिकारी कार्यालय अंतर्गत कार्यरत कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी असलेल्या शासकीय निवासस्थानाची अत्यंत दुरावस्था झाल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे २०१५ मध्ये उघडकीस आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवासस्थाने दुरुस्तीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास, जलसंधारण मंत्री, मा.महसूल मंत्री यांना दिनांक २६ मे, २०१५ रोजी व तदनंतरही वारंवार पत्रव्यवहार करुन सदर बाब निदर्शनास आणूनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) अशा प्रकारचे निवेदन/पत्र प्राप्त झालेले नाही
(३) बिलोली येथे कर्मचाऱ्यांसाठी अद्याप निवासस्थाने बांधण्यात आलेली नाहीत. तसेच देगलूर येथील निवासस्थाने सद्य:स्थितीत वापरात असल्याने प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मावळ तालुक्यातील (जि.पुणे) पवना नदीवरील बेबडओहोळ पुलाचे कामाबाबत**

**(३३) ३२८९८ (२२-१२-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मावळ तालुक्यातील (जि.पुणे) औद्योगिक क्षेत्रासह पवन मावळातील पंचवीस गावांना जोडणाऱ्या पवना नदीवरील बेबडओहोळ पुलाचे काम गेल्या चार वर्षापासुन धिम्यागतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या स्लॅबचे काम अंतिम टप्प्यात आले असुन, अद्याप पश्चिमेकडील बाजुचा स्लॅब, तर पुलांच्या दोन्ही बाजुकडील भरावाचे व रस्त्याचे काम अपुर्ण आहे, हे ही खरे आहे काय,
(३) या पावसाळ्यातही नेहमीप्रमाणे पंचवीस गावांच्या नागरीकांना जीव मुठीत घेऊन जुन्या पुलावरील पाण्यातुनच प्रवास करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यावर्षी पुलाचे काम पुर्ण होउुन परिसरातील नागरीकांची दळणवळण सेवा पुर्ण होण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर संबंधित अधिकाऱ्यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत काय, असल्यास पुलाचे काम केव्हा पुर्ण होईल, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०३-२०१६) :**(१) व (२) होय.

पुलाची उंची जास्त असल्यामुळे, पुलाच्या पायाचे डिझाईन (Well Foundation) मध्ये बदल झाल्यामुळे तसेच पुलाच्या जोडरस्त्याचे काम हे भूसंपादन न झाल्यामुळे धिम्या गतीने सुरु होते.

सद्यःस्थितीत पुलाच्या एकूण ६ पैकी ६ पिअरचे काम पूर्ण झालेले असून ७ पैकी ६ पिअरचे काम पूर्ण झालेले असून ७ पैकी ६ गाळ्यांचे स्लॅबचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच १ ॲबटमेंटचे काम पूर्ण झालेले असून १ ॲबटमेंट व १ गाळ्याच्या स्लॅबचे काम बाकी आहे.

जोउरस्त्यासाठी भूसंपादनाचे काम अंतिम टप्प्यात असून भूसंपादन पूर्ण होताच काम तातडीने हाती घेण्यात येत आहे.
(३) अंशतः खरे आहे.

नागरिकांना सद्यःस्थितीत जून्या पुल कम बंधाऱ्यावरुन प्रवास करावा लागत आहे. सदर पुलावरुन वाहतूक सुस्थितीत चालू आहे. मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यावरच पूल पाण्याखाली जातो व त्यावेळेस वाहतूक बंद असते. पर्यायी रस्त्याने वाहतूक चालू असते.
(४) होय.

जोडरस्त्यासह पुलाचे काम अनुदान उपलब्धतेनुसार माहे ३१/१/२०१७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**जालना-भोकरदन (जि.जालना) रोडवरील बावणे पांगरीजवळील**
**पुलाची संरक्षण भिंत बांधण्याबाबत**

**(३४) ३३६०८ (२२-१२-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना-भोकरदन (जि.जालना) रोडवरील बावणे पांगरीजवळील पुलाची संरक्षण भिंत खचली असून अंगारकी निमित्त पायी येणाऱ्या भाविकांच्या जिवीतास धोका निर्माण झाल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाची पाहणी शासनाने केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, उक्त पुलाची संरक्षण भिंत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०३-२०१६) :**(१) हे अंशतः खरे आहे.

प्रश्नाधीन पुलाची संरक्षण भिंत काही प्रमाणात क्षतीग्रस्त झाली आहे.
(२), (३) व (४) केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत भोकरदन-जालना-परतूर रस्त्याची सुधारणा करणे, रामा-२२३, किमी ०/०० ते १/०० किमी ३/०० ते १०/०० व १६/०० ते ५६/०० हे रु. ५७४०.०० लक्ष किंमतीचे काम मार्च, २०१५ च्या अर्थसंकल्पात मंजूर असून यामध्ये सदर पुलाच्या दुरुस्तीचा समावेश आहे. सध्या काम प्रगतीत आहे.

---

**गेणेशोत्सव काळात फुलबाजारातील फुलांचे दर निश्चित करण्याबाबत**

**(३५) ३३७५७ (१५-०१-२०१६). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गणेशोत्सव काळात फुलबाजारातील फुलांचे दर निश्चित करण्याची मागणी “बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव व समन्वय समिती” माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फुलांचे दर निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०६-२०१६) :**(१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दक्षता व गुण नियंत्रण प्रादेशिक विभाग, पुणे यांच्या कारभाराची चौकशी करुन कारवाई होणेबाबत**

**(३६) ३३७९३ (२२-१२-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.डी.एम. फडतारे, उप अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण प्रादेशिक विभाग, पुणे यांच्या मनमानी कारभाराची चौकशी करुन त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही होणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मा.अतिरीक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांना दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे सुचित केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०३-२०१६) :**(१) होय,
(२) श्री.डी.व्ही. फडतरे, उप अभियंता यांची दि. ३०.०५.२०१५ च्या शासन आदेशान्वये दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, पुणे येथून सा.बां. प्रकल्प (खाजगीकरण) उप विभाग, पुणे येथे बदली करण्यात आली आहे. तसेच उक्त निवेदनातील मुद्यांचे अनुषंगाने मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांचे कडून चौकशी अहवाल मागविण्यात आला असता मुख्य अभियंता, पुणे यांच्या दि. ०२.१२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवालानुसार तक्रारीत काही तथ्य आढळून न आल्याने शासन मान्यतेने प्रकरण निकाली काढण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरगा येथील १२ बंगले या शासकीय निवासस्थानांचा बांधा, वापरा, हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर विकास करणेबाबत**

**(३७) ३३७९७ (२२-१२-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा येथील १२ बंगले या शासकीय निवासस्थानांचा बांधा, वापरा, हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर विकास करणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. अधिक्षक अभियंता, सा.बां,मंडळ, उस्मानाबाद यांना दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कुठलीच कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०३-२०१६) :**(१) होय.
(२) नाही.
(३) व (४) सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले असून इमारतीचे आयुष्यमान संपुष्टात आले असल्याचे निदर्शनास आले आहे. या इमारत परिसराचा विकास करण्यासाठी प्राथमिक स्वरुपाचे नकाशे तयार करण्यात आले असून प्राथमिक अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

---

## पुणे जिल्ह्यातील घोडेगाव येथील प्रकल्पांतर्गत अनुसूचित जमातीसाठी असलेल्या वसतीगृहामध्ये आदिवासी मुलांना प्रवेश मिळत नसल्याबाबत

**(३८) ३३८९१ (१८-०१-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील घोडेगाव येथील प्रकल्पांतर्गत अनुसूचित जमातीसाठी असलेल्या वस्तीगृहामध्ये सन २०१५ मध्ये १५६० आदिवासी मुलांना प्रवेशच मिळाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुसूचित जमातीसाठी असलेल्या घोडेगाव प्रकल्प कार्यालयांतर्गत ३८१० एवढी प्रवेश क्षमता असून या वर्षी ५३७४ विद्यार्थ्यांनी प्रवेश मागितला होता, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण घेणारे बाहेर जिल्ह्यातील विद्यार्थी पुणे शहरामध्ये प्रवेश मागत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, पुणे शहराजवळ असलेल्या वाघोली ता.हवेली, जि.पुणे येथील शैक्षणिक संस्थांचे वाढलेले जाळे पाहता व पुणे शहराजवळ असल्याने अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना राहण्यासाठी नवीन वसतीगृह वाघोली येथे मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०३-२०१६) :**(१) व (२) प्रकल्प कार्यालय, घोडेगाव अंतर्गत कार्यरत असलेल्या एकूण २४ वसतीगृहांमध्ये सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात ४१९७ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज केले होते. त्यापैकी ३८१५ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. तथापि, मंजूर क्षमते अभावी ३८२ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकला नाही, ही बाब खरी आहे.
(३) हे खरे आहे.
(४) राज्यात आदिवासी मुला-मुलींकरिता नवीन वसतिगृहे सुरु करावयाच्या अनुषंगाने सद्यस्थितीतील वसतीगृहे, त्याची क्षमता प्रत्येक जिल्ह्यातील/प्रकल्पातील आदिवासी विद्यार्थ्यांची व आसपासच्या परिसरातील शैक्षणिक संस्थांची संख्या व त्याप्रमाणे आवश्यक नवीन वसतीगृहांची संख्या याबाबतचा आढावा घेऊन नवीन वसतिगृह मंजुरीबाबतचा

स्वयंस्पष्ट प्रस्ताव एकत्रितरित्या शासनास सदर करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना कळविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील गोंडवाना सांस्कृतिक संग्रहालयाच्या निर्मितीबाबत**

**(३९) ३४५४२ (२१-१२-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी जीवन, कला व संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या मौल्यवान व दुर्मिळ वस्तुंचा संग्रह आदिवासींचे दागदागिने, देवदेवता मुखवटे, दैनंदिन वापराच्या वस्तु शेतीसाठी वापरण्यात येणारी हत्यारे त्यांचे पोशाख आदि साहित्यांचे जतन करण्यासाठी नागपूर येथे गोंडवाना सांस्कृतिक संग्रहालयाच्या निर्मितीला शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त संग्रहालय सिव्हिल लाईन परिसरातील ५.५ एकर जागेवर होणार आहे काय व गोंडवाना सांस्कृतिक संग्रहालयाच्या बांधकामासाठी २१ कोटी रुपये मंजूर केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त संग्रहालय नागरिकांना कधीपर्यंत खुले करणार आहेत व याबाबत शासनाचे सर्वसाधारण धोरण काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२५-०२-२०१६) :**(१) गोंडवाना सांस्कृतिक संग्रहालय तथा प्रशिक्षण उपकेंद्राची स्थापना दिनांक ४ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयान्वये करण्यांत आली असून याकरिता नागपूर शहरातील जागेची निश्चिती दिनांक १४.०४.२०१५ च्या शासन निर्णयान्वये करण्यांत आली आहे.
(२) गोंडवाना सांस्कृतिक संग्राहालय तथा प्रशिक्षण उपकेंद्र १.६६ एकर इतक्या जागेवर स्थापन होणार असून त्यासाठी एकुण २१.०० कोटी रुपये बांधकामासाठी मंजूर केले आहेत.
(३) सद्यस्थितीत गोंडवाना सांस्कृतिक संग्रहालय तथा प्रशिक्षण उपकेंद्राच्या वास्तूची संकल्पना व आराखडे तयार करण्यासाठी वास्तुविशारद नेमण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग अकोला यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन मे.अजिंक्य कंन्स्ट्रक्शनला नोंदणी प्रमाणपत्र दिल्याबाबत**

**(४०) ३४७४१ (२३-१२-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन मे.अजिंक्य कंन्स्ट्रक्शनला नोंदणी प्रमाणपत्र दिल्या प्रकरणाचे चौकशीचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिनांक ४

जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास दहा महिन्याच्या कालावधी उलटून सुध्दा सदर प्रकरणी कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास सदर प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०३-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) याप्रकरणी प्राथमिक चौकशीमध्ये अनियमितता झाल्याचे आढळून आल्याने संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाहीचा प्रस्ताव संबंधितांकडून मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**परभणी तालुक्यातील पिंगळी मार्गे देऊळगावकडे जाणाऱ्या रस्त्याची झालेली दुरावस्था**

**(४१) ३४७४५ (२३-१२-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी तालुक्यातील पिंगळी मार्गे देऊळगावकडे जाणारा रस्ता खड्ड्यांनी भरल्यामुळे धोकादायक झाला, हे खरे आहे काय,
(२) तसेच हा रस्ता धोकादायक असल्यामुळे त्या रस्त्यावरून एसटीची बस सेवा अनियमित झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रस्त्यांची दुरुस्ती करून एसटी बस सेवा पूर्ववत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०३-२०१६) :**(१), (२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.
सद्यस्थितीत प्रश्नाधीन रस्त्यावर अर्थसंकल्पिय योजनेत ४ कामे व रस्ते देखभाल व दुरुस्ती योजनेत्तर कार्यक्रमात दुरुस्तीचे एक काम प्रगतीत आहे.
रस्त्यावरुन वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.

---

**कोळी जमातीचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्याबाबत**

**(४२) ३५४७२ (२३-१२-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोळी ही अनुसूचित जमात आहे असे महाराष्ट्र शासनाने मान्य करुन तिचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्याबाबत केंद्र शासनास शिफारशीसह दिनांक ५ ऑगस्ट १९६८, २६ मार्च १९७९ व दिनांक १७ मे १९७९ रोजी अहवाल सादर केलेले आहेत ते शासनास मान्य आहे काय,
(२) असल्यास, कोळी ही मूळ अनुसूचित जमात आहे असे मान्य असल्यास तिचा विशेष

प्रवर्गाचे यादीत समावेश करणे चुकीचे आहे काय,
(३) असल्यास, कोळी ही मूळ अनुसूचित जमात आहे हे मान्य असताना कोळीचा समावेश विशेष प्रवर्गाचे यादीत करणाऱ्या अधिकारी व पदाधिकारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-०३-२०१६) :**(१) व (२) कोळी या जातीचा अनुसूचित जमातीच्या यादीत केव्हाही समावेश करण्यात आलेला नाही. कोळी या जातीचा तिच्या तत्सम जमातीसह अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्यासाठी समाज कल्याण सांस्कृतीक कार्य विभाग शासन पत्र १२.०६.१९७९ अन्वये केंद्र शासनाकडे शिफारस करण्यात आलेली होती. तथापि, केंद्र शासनाचे अर्धशासकीय पत्र क्रमांक १२०१६/१७/८१/SCBCD-IV, दिनांक २६.२.१९८१ नुसार एखाद्या समाजाचा/जातीचा, अनुसूचित जमातीत समावेश करण्याकरिता खालीलप्रमाणे निकष निर्धारीत केलेले आहेत.
१. प्राचिन जीवनमान
२. भौगोलिक अलिप्तता
३. भिन्न संस्कृती
४. स्वभावातील बुजरेपणा आणि
५. मागासलेपणा

अनुसूचित जमातीचे वरील निकष पुर्ण करीत नसल्याने केलेली शिफारस शासनाचे पत्र दि.६.११.१९८१ अन्वये मागे घेतली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव (ता.रावेर) जिल्हयातील जिल्हा मार्ग क्र ११, १३ ५८**
**व राज्य मार्ग क्र.४६ ची झालेली दुरवस्था**

**(४३) ३६०८६ (२२-१२-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव (ता.रावेर) जिल्हयातील प्रमुख जिल्हा मार्ग क्र.११, १३, ५८ व राज्य मार्ग क्र.४६ वर मोठ्या प्रमाणात रहदारी वाढल्यामुळे सदर रस्त्यांची मोठया प्रमाणात दुरावस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर रस्ता हा प्रमुख जिल्हा मार्ग व राज्य मार्ग असतांनाही त्याचे काम मानकांप्रमाणे झाले नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याचे मानकांप्रमाणे काम न करणाऱ्या संबंधित ठेकेदाराची चौकशी करुन त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०३-२०१६)** :(१) हे अंशत: खरे आहे.

प्राजिमा-११ व रामा. ४६ हे दोन रस्ते सन २०१४-१५ मध्ये जिल्हा परिषद कडून हस्तांतरीत झाले आहेत. त्यापैकी रामा. ४६ ची लांबी क्षतिग्रस्त आहे व प्रजिमा ११ ची लांबी सुस्थितीत ठेवण्यात आली आहे. प्राजिमा-१३ व प्राजिमा-५८ ची लांबी डांबर मिश्रीत खडीने भरुन वाहतुकीस योग्य करण्यात आलेली आहे.

रा.मा क्र४६ किमी ०/०० ते १२/०० जिल्हा परिषद कडून नुकताच हस्तांतरीत झाला असून क्षतिगस्त लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम मंजूरी निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा जिल्ह्यातील आदिवासी प्रकल्प कार्यालय वर्धा येथे हलविण्यात येत असल्याबाबत**

**(४४) ३६१०६ (२२-१२-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील आदिवासी लोकांना कार्यालयीन कामासाठी देवरी येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयात जाणे अडचणीचे होत असल्यामुळे भंडारा येथे आदिवासी प्रकल्प कार्यालय सुरु करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास विभागाचे दिनांक ०२ सप्टेंबर २०१५ च्या पत्रान्वये भंडारा जिल्ह्यातील आदिवासींची सन २०११ ची लोकसंख्या लक्षात घेता सदर कार्यालय भंडारा येथून वर्धा येथे हलविण्यात येत आहे. परंतु आदिवासी विद्यार्थी सेनेकडून सन २०११ ला केलेली जनगणना चुकीच्या पद्धतीने केली असल्याची तक्रार जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील आदिवासी जनतेकडून भंडारा येथील कार्यालय कायम ठेवण्यासाठी वारंवार होणारी मागणी लक्षात घेता शासनाने आदिवासी प्रकल्प कार्यालय भंडारा येथे कायम ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०३-०३-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर तक्रार शासनास प्राप्त झालेली नाही.

(३) एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, भंडारा कायम ठेवण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरपूर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असलेल्या लिंक रोडचे रुंदीकरण करण्याबाबत**

**(४५) ३६१८० (२२-१२-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असलेल्या लिंक रोडवर गेली

अनेक वर्षात सातत्याने अपघात घडून जिवित व वित्त हानी होत आहे, सन २०१४ मध्ये ६ लोक ठार तर १२ लोक जखमी झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे रुंदीकरण व गतीरोधकाचे काम का होत नाही व शासन याबाबत गांभीर्याने दखल घेवून त्वरीत निर्णय घेणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०३-२०१६)** :(१) पोलीस स्टेशन पंढरपूर शहर यांचेकडील आकडेवारीनुसार सन २०१४ मध्ये ६ अपघात झाले. त्यात २ इसम मयत व ११ इसम जखमी झालेले आहेत.
(२) सदर रस्ता हा सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेप्रमाणे प्रमुख जिल्हा मार्ग क्र.८२ हा आहे. या रस्त्याची एकूण लांबी १.७६० कि.मी. असून रस्त्याची धावपट्टी सद्या १०.०० मी. इतकी आहे. आयआरसी मानकाप्रमाणे २०००० पेक्षा जादा पीसीयु असल्यास रस्ता चौपदरीकरण करता येतो. सदर रस्ता चौपदरीकरण करावयाचा झाल्यास २१ मीटर रुंदीने भूसंपादन करणे आवश्यक आहे.

वाहतूक सुरक्षिततेसाठी या रस्त्याच्या साखळी क्र.०/१५०, ०/४०० व कि.मी. ०/७०० या तीन ठिकाणी गतिरोधक बसविले आहेत. तसेच ठिकठिकाणी सूचना फलक लावण्यात आलेले असून रस्ते दुभाजक पट्टे, क्रॉसिंगच्या ठिकाणी पट्टे इत्यादी कामे केलेली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सांगली-कोल्हापूर जिल्हयाचा दुवा साधणाऱ्या ऐतवडे (खु) (ता.वाळवा) येथील वारणा नदीवरील साकव पुलाची दुरुस्ती करुन उंची वाढविण्याबाबत

**(४६) ३६८९५ (१६-०१-२०१६). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली-कोल्हापूर जिल्हयाचा दुवा साधणाऱ्या ऐतवडे (खु) (ता.वाळवा) येथील वारणा नदीवरील साकव पुलाची दुरुस्ती करुन उंची वाढविण्याबाबत तेथील ग्रामस्थांनी शासनाकडे सातत्याने मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळ्यात वारणेला ४ ते ५ वेळा महापूर येत असल्याने येथील ग्रामस्थांना किमान १३ ते १५ दिवस पाण्याखाली रहावे लागत असल्याने व शहराचा संपर्क तुटत असल्याने साकव पुलाची उंची वाढविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप काहीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०३-२०१६)** :(१) विषयांकित रस्त्यावर साकव नसून बुडणारा पूल आहे. प्रस्तुत प्रकरणी निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी अस्तित्वातील बुडीत पुलाऐवजी उंच पूलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

---

**यवतमाळ जिल्हयातील मारेगाव तालुक्यातील कुंभा गावाजवळून गेलेल्या बेंबळा प्रकल्पाच्या कालव्यावरील ओलांडणी पुलाचे बांधकाम रखडल्याबाबत**

**(४७) ३७०५२ (२२-१२-२०१५). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील मारेगाव तालुक्यातील कुंभा गावाजवळून गेलेल्या बेंबळा प्रकल्पाच्या कालव्यावरील ओलांडणी पुलाचे बांधकाम गेल्या १० वर्षापासून रखडले असून पुलाचा प्लॅन पुन्हा बदलल्याने ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलाच्या बांधकामाचा प्रस्तावित आराखडा सलग चौथ्यांदा बदलला असून निधी उपलब्ध असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांच्या दुर्लक्षामुळे अद्याप या पुलाचे काम पूर्ण होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तातडीने या पुलाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) किती कालावधीत हा पुल बांधून पूर्ण होणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०३-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) पुलाचे काम प्रगती पथावर असून एप्रिल २०१६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**आदिवासी लाभार्थ्यांना गॅस शेगडया पुरविण्याबाबत**

**(४८) ३७८६१ (२२-१२-२०१६). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गॅस शेगडया आदिवासी लाभार्थ्यांना पुरविण्यासाठी दि. १० ऑक्टोबर, २००६ रोजी विशेष केंद्रीय सहाय्य योजना तसेच दि. २० ऑक्टोबर, २००६ रोजी या योजनेतंर्गत दारिद्ररेषेखालील कुटुंबांना वाटप करण्याचा निर्णय शासनाने घेतला , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिंवडी, वाडा, शहापूर या आदिवासीबहूल तालुक्यात गॅस शेगडया वाटपाविना गोडाऊनमध्ये पडलेल्या आहेत, हे देखील खरे आहे काय,

(३) असल्यास, यामध्ये पुरवठा व वाटप यांच्यात देखील मोठी तफावत असल्याचे उघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१० ते आजपर्यंत वाटप झालेल्या शेगडया व पुरवठा केलेल्या गॅस शेगडयांची आकडेवारी किती आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०३-०३-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) भिवंडी, वाडा व शहापूर तालुक्याच्या एकूण प्राप्त गॅस शेगड्या वाटप व

शिल्लक गॅस शेगड्यांचा तपशिल खालीलप्रमाणेः-

| तालुका | प्राप्त शेगड्या | वाटप झालेल्या शेगड्या | गोदामात शिल्लक शेगड्या |
|---|---|---|---|
| शहापूर | १४९१ | १४३१ | ६० |
| भिवंडी | ६२२ | ५५० | ७२ |
| वाडा | २८९० | २८९० | ०० |
| एकूण | ५००३ | ४८७१ | १३२ |

---

**उल्हासनगर (ठाणे) येथील आदिवासी मुलींचे वसतीगृहातील असुविधेबाबत**

**(४९) ३८९१२ (१३-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) कॅम्प न.५ येथील गांधी रोड परिसरात तहसिलदार कार्यालयाजवळच असलेल्या आदिवासी मुलींच्या शासकीय वसतीगृहात असलेल्या असुविधांकडे लक्ष वेधण्यासाठी वसतीगृहातील मुलींनी दिनांक ११ एप्रिल, २०१५ रोजी निषेध करुन वसतीगृहातील दुरावस्था प्रसार माध्यमांच्या समोर मांडल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतीगृहातील अधिक्षीका या केवळ महिला असून इतर कर्मचारी वर्ग पुरुष असल्याचे त्यांची अडचण होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वसतीगृहात निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जाणे, सोलर मशीन बंद असणे, शैक्षणिक साहित्य मिळत नाही, वैद्यकीय साहित्य नाही, सफाई कामगार नाही, वैद्यकीय तपासणीसाठी स्वतःच जावे लागणे इत्यादी बाबी निदर्शनास आणल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-०३-२०१६) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

प्रस्तुत वसतीगृहातील विद्यार्थ्यांनींना सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात विभागाच्या दि. ११.११.२०११ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार दरमहा निर्वाह भत्ता, स्वच्छता भत्ता, शैक्षणिक साहित्य, बेडींग साहित्य, टि.व्ही. संच, इंटरनेट सुविधेसह संगणक, वॉटर कुलर, सोलर मशीन इत्यादी साहित्याचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्ह्यातील सातारा-रहिमतपूर (ता.सातारा) या राज्यमार्गावरील गोडोली नाका-दत्तनगर (खोकडवाडी) या रस्त्याची झालेली दुरावस्था**

**(५०) ३९५८१ (१३-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील सातारा-रहिमतपूर (ता.सातारा) या राज्यमार्गावरील गोडोली नाका-दत्तनगर (खोकडवाडी) या सुमारे ५ कि.मी. रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक वर्षी पावसाळा संपल्यावर सदर रस्त्यात मोठमोठे खड्डे पडणे नित्याचेच आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पावसाच्या पाण्याचा नाल्यातून निचरा होऊ न शकल्याने पाणी रस्त्यावर साचून रस्त्यावरील डांबर वाहून जाते, त्यामुळे नाल्यांची खोली वाढवणे वा सदर रस्त्याचे काँक्रिटीकरण करणे याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०३-२०१६) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

विषयांकित रस्ता हा महाबळेश्वर-विटा राज्य मार्ग क्र. १४० चा भाग असून कोडोली नाका कि.मी.५५.० ते ५९.४ यादरम्यान आहे. सदर रस्त्याचा काही भाग सखल असल्यामुळे पावसाळयात खराब होतो.

(३) विषयांकित रस्त्यापैकी कि.मी ५५.८ ते ५६ ही लांबी राष्ट्रीय महामार्ग क्र.४ चा भाग असून सदर लांबीत सहा पदरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. तर उर्वरित लांबीतील रस्त्यापैकी कि.मी. ५७.५ ते ५८.८५ या लांबीतील सखल रस्त्याची उंची वाढविणे, साईडला कॉक्रिट गटार बांधणे व उर्वरित लांबीत रस्त्याची सुधारणा करणे ही कामे मंजूर असून सदरील कामे लवकरच पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.